# मिरा भाईंदर महानगरपालिका

जा.क्र. मनपा/आयुक्त/४७/२०२२-२३
आयुक्त यांचे कार्यालय
दि.२१/०७/२०२२

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## आदेश

विषय:- रु.१० लाख (रु.१०,००,०००/-) पर्यंतच्या कामांबाबत.

संदर्भ:- १. महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक: भांखस २०२१/प्र.क्र.८/उद्योग-४, दिनांक:- ०७ मे, २०२१

२. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक: सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२, दिनांक: २०/०५/२०२१

कृपया संदर्भिय शासन निर्णयांचे अवलोकन व्हावे.

उपरोक्त शासन निर्णयांन्वये महानगरपालिका विभागांमार्फत रु.१० लाख पर्यंतच्या कामांसाठी दरपत्रके मागवून माल/वस्तू/सेवा यांची खरेदी करण्याची कार्यवाही करण्यात येते. अशी खरेदी तातडीच्या किंवा अत्यावश्यक बाबींच्या बाबतीत होणे अभिप्रेत आहे. तथापि, विभागांमार्फत सरसकट सर्वच रु.१० लाखापर्यंतच्या कामांसाठी दरपत्रके मागविण्यांत येत असल्याची; तसेच मोठ्या कामांचे अनावश्यकपणे लहान लहान कामांत विभागणी करुन दरपत्रके मागविली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. ही प्रथा काटेकोरपणे टाळण्यात यावी.

यापुढे केवळ निकडीच्या/तातडीच्या किंवा अत्यावश्यक बाबींच्या बाबतीतच रु.१० लाखापर्यंतच्या कामांसाठी दरपत्रके मागविण्यात यावीत. रु.१० लाखांपर्यंतची जी कामे निकडीची/तातडीची किंवा अत्यावश्यक नाहीत अश्या कामांसाठी दरपत्रके मागविण्याऐवजी रितसर ई-निविदा प्रक्रिया पूर्ण करावी. कसल्याही परिस्थितीत अनावश्यक कामाचे तुकडे करुन दरपत्रके (Quotation) ची कामे करण्यात येऊ नये.

उपरोक्त आदेशाचे तंतोतंत पालन करावे.

**(दिलीप ढोले)**
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,

१. अतिरिक्त आयुक्त
२. विभागप्रमुख/खातेप्रमुख (सर्व)
३. मूळ नस्ती

दरपत्रकाच्या आधारे करण्यात येणाऱ्या खरेदीची मर्यादा रु. ३ लाखावरुन रु. १० लाखापर्यंत वाढविणे बाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्रमांक: भांखस २०२१/प्र.क्र.८/उद्योग-४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक:- ०७ मे, २०२१

पहा:- १. शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक भांखस-२०१४ प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक ०१ डिसेंबर, २०१६.

२. शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक संकिर्ण-२०१६ प्र.क्र.२१५/ उद्योग-४, दिनांक २४ ऑगस्ट, २०१७.

प्रस्तावना:

उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि.०१/१२/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीच्या सुधारीत नियमपुस्तीकेतील परिच्छेद क्र.३.२.२ मध्ये "जेव्हा खरेदीची किंमत रुपये ५ हजार (रु.५,०००/-) पेक्षा जास्त व रुपये ३ लाख (रु.३,००,०००/-) पर्यंत असेल तेव्हा खरेदी दरपत्रक मागवून (खुली स्पर्धात्मक निविदा न मागवता) करता येईल. यासाठी खरेदी किंमतीच्या मर्यादेत वाढ करण्याबाबत दर ५ वर्षांनी उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग आढावा घेऊन स्वतंत्र आदेश निर्गमित करेल (परिशिष्ट ९). अशी दरपत्रके खुल्या बाजारातून कमीत कमी तीन वेगवेगळ्या पुरवठादार / उत्पादकांकडून तुलना करण्यासाठी मागविण्यात यावीत. दरपत्रक सादर करणाऱ्या निविदाकारांचा खरेदी कार्यालयाबरोबर कोणताही हितसंबंध नसावा. तसेच यापुर्वी असे दिसून आले आहे की, खरेदी अधिकारी मोठे आदेश लहान-लहान आदेशांमध्ये विभागाणी करतात आणि ते त्याच विक्रेत्यांकडून दरपत्रकाच्या माध्यमातून खरेदी करतात. ही प्रथा काटेकोरपणे टाळण्यात यावी. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तुच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकुण मूल्य रु.३ लाखांपेक्षा (रु.३,००,०००/-) जास्त नसावे" असे सद्यस्थितीत प्रचलित तरतूदीत नमुद केले आहे.

त्यानुषंगाने उद्योग विभागाच्या दिनांक ०१.१२.२०१६ रोजीच्या सुधारीत खरेदी धोरण नियमपुस्तिकेतील परिच्छेद क्र. ३.२.३ मधील दरपत्रकाच्या आधारे खरेदीची मर्यादा रु.३ लाखावरून (रु. ३,००,०००/-) रु.१० लाखापर्यंत (रु. १०,००,०००/-) वाढविण्याची मागणी विविध विभांगाकडून करण्यात येत होती. सदर मागणीचा सर्व साकल्याने विचार करून प्रस्तूत बाब मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीच्या विचारार्थ ठेवण्यात आली होती.

शासन निर्णय:-

उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.०१/१२/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या सुधारित कार्यपध्दती विहित करण्यात आंल्या आहेत. उपरोक्त नमुद वस्तुस्थिती लक्षात घेता व मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार पुनर्विलोकन समितीच्या दि.२७.०४.२०२१ रोजी झालेल्या बैठकीत

केलेल्या शिफारशीनुसार शासन या आदेशानुसार, " खरेदीच्या नियमपुस्तिकेतील परिच्छेद क्र ३.२.३ मध्ये सुधारणा करून दरपत्रकाच्या आधारे करण्यात येणाऱ्या खरेदीची आर्थिक मर्यादा रु. ३ लाखावरून (रु.३,००,०००/-) रु.१० लाखापर्यंत (रु.१०,००,०००/-) सर्व कर अंतर्भूत करुन वाढविण्याचा निर्णय घेत आहे. तसेच रु. १० लाख (रु.१०,००,०००/-) व त्यापुढील खरेदीसाठी ई-निविदा पद्धतीचा अवलंब करणे अनिवार्य करण्यात येत आहे ."

तसेच दरपत्रके खुल्या बाजारातून कमीत कमी तीन वेगवेगळ्या पुरवठादार / उत्पादकांकडून तुलना करण्यासाठी मागविण्यात यावीत. दरपत्रक सादर करणाऱ्या निविदाकारांचा खरेदी कार्यालयाबरोबर कोणताही हितसंबंध नसावा. तसेच यापुर्वी असे दिसून आले आहे की, खरेदी अधिकारी मोठे आदेश लहान-लहान आदेशांमध्ये विभागणी करतात आणि ते त्याच विक्रेत्यांकडून दरपत्रकाच्या माध्यमातून खरेदी करतात. ही प्रथा काटेकोरपणे टाळण्यात यावी. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तुच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकुण मूल्य रु.१० लाखांपेक्षा (रु.१०,००,०००/-) जास्त नसावे.

सदरचा शासन निर्णय हे सर्व शासकीय / निमशासकीय खरेदी संस्थेतील दरपत्रकाच्या आधारे करण्यात येणाऱ्या सर्व खरेदींना लागू राहिल. तसेच या विभागाच्या दि.०१/१२/२०१६ रोजीच्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या सुधारित कार्यपध्दतीच्या नियमपुस्तिकेतील इतर तरतुदी पुर्ववत राहतील.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२१०५१०१३०४२४०५१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY SHANKARRAO INGLE

Digitally signed by SANJAY SHANKARRAO INGLE
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f0d616600e4d2f510d1c8cc19813e070ad282d2275bf6fc132a2dee97f14e0a6, cn=SANJAY SHANKARRAO INGLE
Date: 2021.05.10 13:14:29 +05'30'

( संजय इंगळे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा. मंत्री (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
४) अप्पर मुख्य सचिव, (उद्योग), ऊर्जा व कामगार विभाग मंत्रालय, मुंबई
५) अप्पर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव,नियोजन विभाग , मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
९) प्रधान सचिव, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई

१०) प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
११) प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई
१३) उप सचिव, (उद्योग-४), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मुंबई
१४) निवडनस्ती उद्योग-४.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या
कामांकरिता ई-निविदेसंदर्भात

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग,
शासन निर्णय क्रमांक: सीएटी-२०१७/प्र.क्र. ८/इमा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : २०/०५/२०२१

वाचा : १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.मातंसं/नस्ती/२०१०/प्र.क्र.३४/३९, दिनांक ६ ऑगस्ट,२०१०
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.मातंसं/नस्ती/२०१२/प्र.क्र. २७३/३९, दि. २६ नोव्हेंबर, २०१४
३) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र. सीएटी-२०१७/प्र.क्र.०८/इमा-२, दिनांक २७ सप्टेंबर,२०१८
४) उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.भांखस-२०२१/प्र.क्र.८/उद्योग-४, दिनांक ७ मे,२०२१
५) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. मातंसं/०५४/३१/२०१६/३९, दिनांक ११ मे, २०२१

प्रस्तावना :

शासकीय कामे, साधन सामुग्रीची खरेदी, इत्यादीमध्ये पारदर्शीपणा आणण्यासाठी शासकीय खरेदी कामे इत्यादी करिता ई-निविदा पध्दतीचा अवलंब करण्याचा निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ६ ऑगस्ट, २०१० रोजीच्या शासन निर्णयाव्दारे घेण्यात आलेला आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २६ नोव्हेंबर, २०१४ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे रु. ३ लक्ष पेक्षा जास्त किंमतीच्या निविदेकरिता ई-निविदा पध्दतीचा अवलंब करण्यात येत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक २७ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ई-निविदा प्रक्रीयेअंतर्गत रु.३ लक्ष रकमेवरील कामे ई-निविदा प्रसिध्द करुन प्रचलित कार्यपध्दतीनुसार सदर निविदेसंदर्भात पुढील कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ११ मे, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये ई-निविदा संदर्भात सामान्य प्रशासन विभागाने दिलेले सर्व आदेश अधिक्रमीत करुन यापुढे ई-निविदा संबंधीत कार्यवाही उद्योग उर्जा व कामगार विभागाने खरेदी संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

उद्योग उर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ७ मे,२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.१० लक्ष (सर्व कर अंर्तभूत करुन ) व त्यापुढील खरेदीसाठी ई-निविदा पध्दतीचा अवलंब करणे अनिवार्य करण्यात आलेला आहे. त्यास अनुसरुन सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ११ मे,२०२१ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे देण्यात आलेल्या सूचनांस अनुसरुन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे :-

**शासन निर्णय :-**

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २६.११.२०१४ च्या शासन निर्णयानुसार व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक २७.९.२०१८ मध्ये नमूद केल्यानुसार रु.३ लक्ष रकमेवरील कामे ई-निविदा पध्दतीने करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. आता या निर्णयाव्दारे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामांकरिता रु. १० लक्ष (सर्व कर अंर्तभूत करुन)रकमेवरील कामांकरीता ई-निविदा पध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२१०५२०१६४६३६०९१८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SACHIN MANIKRAO CHIVATE

Digitally signed by SACHIN MANIKRAO CHIVATE
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=PUBLIC WORKS DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=643026ceca9d6dc21fa6c4525f6fd9fbdfc59a9a42af9ca3066f28a4b58ad630, cn=SACHIN MANIKRAO CHIVATE
Date: 2021.05.20 16:55:40 +05'30'

(सचिन चिवटे)

अवर सचिव , महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई
२. मा. मंत्री (सार्वजनिक बांधकाम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. राज्यमंत्री (सार्वजनिक बांधकाम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
५. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/सचिव,
६. सार्वजनिक बांधकाम विभाग/वित्त विभाग/ग्राम विकास विभाग
७. महालेखापाल-१, मुंबई
८. महालेखापाल-२, नागपूर
९. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई/नागपूर
१०. प्रत, महासंचालक, माहिती व प्रसिध्दी महासंचालनालय, मुंबई यांना प्रसिध्दीसाठी

**प्रत, माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी :-**

११. सर्व मुख्य अभियंते, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, (विद्युतसह)

१२. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई

१३. संचालक, उद्याने व उपवने, मुंबई

१४. सर्व अधीक्षक अभियंते, सार्वजनिक बांधकाम विभाग, (विद्युत / यांत्रिकी)

१५. अधीक्षक अभियंता यांनी आपल्या अधिनस्त विभागातील कार्यालयांना सदर शासन निर्णयाची प्रत अग्रेषित करावी.

१६. मुख्य अभियंता / अधीक्षक अभियंता, पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, वरळी, मुंबई

१७. सर्व संहसचिव/उपसचिव/अवर सचिव/ कार्यासन अधिकारी, सा.बां.वि., मंत्रालय, मुंबई

१८. कार्यासन इमारती-२ (निवडनस्ती)